महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan" 3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001
Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

**पत्र-ईमेल** क्रमांक:- कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.२६५/2866 /२०२५-२६, दिनांक 12 /११/२०२५

विषय :- Proposal for diversion of 3.48 ha. Forest land under FCA 1980 for Gravity diversion Scheme Nanashi Link Cut/Canal in village Nanashi, Tal. Dindori, Dist. Nashik in the State of Maharashtra.

संदर्भ :- १. पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. FC-I/MH-२९३/२०२२-NGP/१०५१०, दिनांक ३१/१०/२०२२.
२. तत्का. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांचेकडील पत्र क्र. कक्ष-२/जमीन/प्र.क्र.४/२१-२२/६७७/२३-२४, दिनांक ०४/०९/२०२३.
३. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.२६५/५३१९/२३-२४, दि. २७/०२/२०२४.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांचे कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-२/जमीन/प्र.क्र.४/२०२१-२२/९६३/२४-२५, दि. १७/१२/२०२४.
५. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.२६५/५२८३, दिनांक १२/०२/२०२५
६. आपले कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-२/जमीन/प्र.क्र.०४/२०२१-२२/८२६/२०२५-२६, दिनांक १६/१०/२०२५

प्रस्तुत विषयांकित प्रकरणी उपरोक्त संदर्भिय पत्र-१ अन्वये केंद्र शासनाने वन (संरक्षण एवम संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत प्रकल्प यंत्रणेस खालीलप्रमाणे अट घालून दिलेली होती.

***"DCF, West Nashik has mentioned in his Part-II that there is presence of White Rumped Vulture, Long Billed Vulture and Leopard which are Schedule-I species Specific comments from PCCF (Wildlife) in this regard needs to be submitted"***

वरील अटीचे अनुषंगाने तत्का. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र-२ अन्वये वन्यजीव संवर्धन आराखडा सहमतीसह या कार्यालयास सादर केलेला होता.

प्रकरणी, प्राप्त वन्यजीव संवर्धन आराखड्याचे या कार्यालयात तांत्रीक संस्करण केले असता, त्रृटी निदर्शनास आल्यामुळे या कार्यालयाचे संदर्भिय पत्र-३ अन्वये प्रकल्प यंत्रणेकडून व्यवस्थापन आराखड्यातील त्रृटींची पुर्तता करून देण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक यांचे संदर्भिय पत्र-४ अन्वये सुधारीत आराखडा या कार्यालयाचे मान्यतेसाठी सादर केलेला आहे. सदर आराखड्याची तपासणी केली असता, त्रृटी निदर्शनास आले असल्यामुळे त्रृटींची पुर्तता करून, सदरील आराखडा वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने योग्य असल्याचे बाबी तपासून, आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सुधारीत आराखडा विहित मार्गाने या कार्यालयास सादर करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भ पत्र ५ अन्वये कळविण्यात आलेले होते.

आता, प्रवाही वळण योजना ननाशी लिंक कट/कॅनाल, ता. दिडोंरी या योजनेचा सुधारीत वन्यजीव (संवर्धन) अराखडा रु. ६९.०४ लक्ष व मृद व आर्दता संरक्षण आराखडा रु. ६.८५ लक्ष (एकुण रु. ७५.८९ लक्ष) तसेच वन्यजीव संवर्धनासाठी जलसंपदा विभागातर्फे प्रस्तावीत कालव्यावर एक पुल बांधण्यासाठी अतिरिक्त रु. ३०.०० लक्ष रक्कमेचा एक पुल बांधणेचे हमीपत्रासह सुधारीत आराखडा वन्यजीव संवर्धनाच्या दृष्टीने पोषक स्वरूपाचा असल्याने त्यास मंजुरी देणेकामी मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक यांनी संदर्भ पत्र ६ नुसार शिफारस केलेली आहे.

मुख्य वनसंरक्षक (प्रा), नाशिक यांनी-रु. १०५.८९ लक्ष आर्थिक तरतुद आराखड्यामध्ये केलेली आहे. त्यानुसार बाबनिहाय तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

**The outlay of the WLCP will be broadly divided for activity as below;**

| Sr. No. | Item | Total Outlay of Wildlife Conservation Plan |
|---|---|---|
| 1. | Human animal conflict and mitigation measures<br>i) Rescue Vehicle with crane/cages and equipment<br>ii) Habitat Management- Water holes, Solar Pump<br>iii) Monitary Vehicle | <br>Rs. 24.00 Lakhs<br>Rs. 6.00 Lakhs<br>Rs. 15.00 Lakhs |
| 2. | i) Awareness and Extension- raising of PRTs<br>ii) Training / Workshops for awareness regarding Vulture and Leopard | Rs. 10.00 Lakhs<br>Rs. 5.00 Lakhs |
| 3. | Administrative Cost and Miscellaneous. | Rs. 9.04 Lakhs |
| | **Total** | **Rs. 69.04 Lakhs** |

**महत्वाचे रस्ता/कालवा/सोहमार्ग दूतर्फा वृक्ष लागवड कामांचे अंदाजपत्रके कमी पावसाच्या प्रदेश पूर्व पावसाळी ते तृतीय वर्ष कामाचे अंदाजपत्रकीय गोषवारा**

| | | |
|---|---|---|
| १. | लागवड पुर्व कामे | ५४८६१.०२ |
| २. | प्रथम वर्ष कामे | २८२२९४.६२ |
| ३. | व्दितीय वर्ष कामे | १८३९३५.१२ |
| ४ | तृतीय वर्ष कामे | १६३८०८.१८ |
| | **एकुण** | **६८४८९९.००** |
| | | **(६.८५ लक्ष)** |

| | | |
|---|---|---|
| **1.** | To Construct one bridge on Link cut/canal for mitigation of wildlife amounting approximately | 30.00 Lakhs |
| | **Total** | **30.00 Lakhs** |

**तरी, शासनाने घालून दिलेल्या अटीचे अनुषंगाने वरीलप्रमाणे रू. ६९.०४ लक्ष, रु. ३०.०० लक्ष आणि रु. ६.८५ लक्ष असे एकुण रु. १०५.८९ लक्ष रक्कम असलेला आराखडा वन्यजीव व्यवस्थापनाच्या दृष्टीने पोषक स्वरूपाचा असल्यामूळे, त्यांस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**(एम. श्रीनिवास रेड्डी)**
मुख्य वन्यजीव रक्षक तथा
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
नाशिक.

प्रतिलिपी : उपवनसंरक्षक (प्रादेशिक) पश्चिम भाग, नाशिक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलिपी : कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, नाशिक यांना माहितीस अग्रेषित.
ईमेल- eemid.nashik@gmail.com